
• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३१९ • मंगळवार,दि.२० फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 319 • Tuesday 20 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
|बीड | परभणी |छत्रपती संभाजीनगर |जालना |लातूर |धाराशिव |हिंगोली | नांदेड | नगर
# मराठवाडा पत्र
▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955



# बीडमध्ये शिवजयंतीचा जल्लोष -आ.संदीपभैय्या

**बीड । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे बीडकरांना शिवजयंती च्या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी मिळाली. आ.संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकारातून सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहर च्या परिपूर्ण नियोजनातून सार्वजनिक शिवजयंती उत्सव सोहळा पार पडला . यावेळी राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय दर्जाच्या खेळ, प्रात्यक्षिक आणि विविध प्रकारातील सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी बीडकरांना मिळाली.



देशाच्या विविध भागातून आंतराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या विविध संस्कृतीक कार्यक्रम बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण याठिकाणी संपन्न झाले. मागील १७ वर्षांपासून अखंडितपणे बीड शहरात विविध नाविन्यपूर्ण कार्यक्रमाच्या स्वरूपाने आ.संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकारातून शिवजयंती उत्सव होत आहे. यावर्षी देखील सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर च्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. चित्तथराक प्रात्यक्षिक, शिवकालीन मर्दानी खेळ प्रात्यक्षिक, महाराषट्रातील विविध भागातील ढोल पथक, केरळ ची पुरातन युद्धकला, आंतराष्ट्रीय दर्जाच्या लेजर-शो च्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी जीवनपट यावेळी दाखवण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज हे माझे सर्वस्व आहेत. शिवरायांचे आदर्श विचार पुढे घेऊन जाणे आपले कर्तव्य असून आपण ते अविरत करू. येणाऱ्या काळातही शिवजयंती अशाच उत्साहाने अखंडित साजरी करू अशा शब्दात बीडकरांना आ.संदीप क्षीरसागर शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान आपल्या आईच्या आठवणीने यावेळी आ.क्षीरसागर भावनिक झाले. प्रत्येक शिवजयंती ला माझी आई याठिकाणी उपस्थित असायची, ती यावेळी उपस्थित नाही परंतु इथे उपस्थित प्रत्येक मायमाऊली मध्ये मी माझी आई बघतो. जोपर्यंत यांचा आशीर्वाद माझ्या डोक्यावर यांचा हात आहे. तोपर्यंत मला कोणीही पोरका करू शकत नाही अशा भावना यावेळी त्यांनी व्यक्त केल्या.



## अंतरवाली सराटीत शिवजयंतीचा उत्साहात साजरी

**वडगोद्री । वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अवघ्या देशभरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. अंतरवाली सराटीतही मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात येत आहे. संपूर्ण गावात भगवे झेंडे, पताका लावण्यात आल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने अंतरवाली सराटी येथील उपोषण स्थळालाही आकर्षक सजावट करण्यात आली आहे. दरम्यान मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज १० वा दिवस आहे. जरांगे यांनीही शिवजयंतीच्या कार्यक्रमात सहभागी होत शिवरायांना अभिवादन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्यास सुंदर हार घालण्यात आला असून, उपोषण स्थळावर सुंदर फुलांची आरास केलेली पाहायला मिळत आहे. शिवाय उपोषण स्थळावर ठिकठिकाणी भगवे झेंडे लावल्याने उपोषण स्थळ भगवेमय झाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती ठेवण्यासाठी एक लहानशी पालखी सुंदर फुलांच्या माळांनी सजवण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पंच धातूची मूर्ती पालखीत ठेऊन गावातून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीआधी शिवाजी महाराज यांची आरती देखील करण्यात आली. गावातून काढण्यात आलेल्या मिरवणूकीत मनोज जरांगे पाटील यांच्यासह नारायणगडाचे महंत शिवाजीमहाराज देखील सहभागी झाले होते. सकाळी ९ वाजता अंतरवाली गावात छ्रत्रपती शिवाजी महाराजांची भव्य शोभायात्रा काढण्यात आली.



## शिवसेना ठाकरे गट १८ लोकसभा जागा लढणार

**मुंबई । वृत्तसेवा**

आगामी लोकसभा निवडणुकांची घोषणा अवघ्या काही दिवसांत होण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले असून महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाची चर्चा सुरू आहे. महाविकास आघाडीच्या सातत्याने बैठका होत असून तिन्ही पक्षांचे जागावाटप निश्चित झाल्याचे सांगण्यात येते. तर, महायुतीकडूनही जागावाटप योग्यवेळी जाहीर होईल, कुठलीही नाराजी असणार नाही, असे सांगितले जाते. त्यातच, आता शिवसेना उबाठा गटाकडून १८ जागांवर दावा करण्यात आल्याचे दिसून येते.

शिवसेना उबाठा गटाकडून राज्यातील १८ मतदारसंघात निवडणूक समन्वयकांची घोषणा करण्यात आली आहे. शिवसेनेच्या लोकसभानिवडणूक समन्वयकांची यादीच शिवसेना उबाठाने जाहीर केली आहे. त्यामध्ये, मुंबईतील ४ आणि ठाण्यातील जागेवरही त्यांनी समन्वयकाची नियुक्ती केली आहे. तर, मराठवाड्यातील हिंगोली, परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव जिल्ह्यातील जागांवरील मतदारसंघात निवडणूक समन्वयक नेमले आहेत. त्याशिवाय कोकणातील रायगड तर प.महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि मावळ मतदारसंघातही समन्वयकांची नेमणूक केली आहे. त्यामुळे, शिवसेनेनं अप्रत्यक्षपणे १८ जागांवर दावा केल्याचं दिसून येत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपला रोखण्यासाठी महाविकास आघाडीने राज्यात मूठ बांधली आहे. महायुतीच्या विरुद्ध महाविकास आघाडीने रणशिंग फुंकले आहे. शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार आणि काँग्रेसची जागावाटपावर चर्चा सुरू आहे. त्यातच, वंचित बहुजन आघाडीच्या प्रकाश आंबेडकर यांनाही महाविकास आघाडीत घेण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे, महाराष्ट्रातील ४८ जागांपैकी या तिन्ही पक्षांचं जागावाटप कसं असेल आणि वंचितला किती जागा दिल्या जातील, यावर राजकीय वर्तुळाच चर्चा होते. तर, शिवसेनेकडून गत पंचवार्षिकमध्ये जिंकलेल्या १८ जागांवर दावा केला जात आहे. त्यातच, आज शिवसेना उबाठाकडून लोकसभेच्या १८ मतदारसंघातील निवडणूक समन्वयकांची नेमणूक करण्यात आल्याने ठाकरे गटाचा हा दावा जवळपास निश्चित झाला की काय, असेच म्हणता येईल.

## कारमधून गांजाची तस्करी

**नागपूर । वृत्तसेवा**

आंध्रप्रदेशातून आलेल्या एका कारमधून ५० किलो गांजाची तस्करी करण्यात आल्याची बाब समोर आली आहे. नागपूर पोलिसांच्या गुन्हेशाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने ही कारवाई केली असून उत्तरप्रदेशमधील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. आंध्रप्रदेशातील विशाखापट्टणम येथून एका पांढऱ्या रंगाच्या कारमधून गांजा तस्करी होणार असल्याची माहिती गुन्हेशाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार रविवारी सकाळी वर्धा मार्गावरील चिंचभुवन परिसरात सापळा रचण्यात आला. सकाळच्या सुमारास एचआर २६ एएक्स ०१२७ या कारला अडविण्यात आले. पोलिसांनी कारची झडती घेतली असता त्यात तीन पोत्यांमध्ये ५० किलो ओलसर गांजा आढळला. पोलिसांनी कारचालक यशपाल नानकचंद चव्हाण (३२) व अंकित श्यामवीर सिंग (२१) दोघांनाही अटक केली. दोघेही उत्तरप्रदेशातील गाजियाबाद जिल्ह्यातील अकबरपूरयेथील निवासी आहेत. त्यांच्या ताब्यातून गांजा, मोबाईल फोन व कार असा १७.७१ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## काँग्रेस पक्ष कोणीही संपवू शकत नाही -देशमुख

**लातूर । वृत्तसेवा**

माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्यापासून प्रेरणा घेत काँग्रेस पक्ष एकसंध आहे. पक्षात कोणतेही गट-तट नाहीत. सर्वसामान्यांचा विश्वास असलेली काँग्रेस पुन्हा सत्तेत येईल. काँग्रेस पक्षाला कोणीही संपवू शकत नाही, असा विश्वास काँग्रेस नेत्यांनी व्यक्त केला. लातूरनजीकच्या निवळी येथे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण झाले. त्यावेळी प्रमुख नेत्यांनी पक्ष पुन्हा सत्तेत आणण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह अनेक नेते, देशमुख कुटुंबीय उपस्थित होते. लातूर : काका-पुतण्याचे नाते कसे असावे याचे उत्तम उदाहरण मंचावर आहे, असे सांगत अभिनेता रितेश देशमुख यांनी आपले काका दिलीपराव यांच्याकडे पाहत मी तुमच्यावर खूप प्रेम करतो, अशी भावनिक साद घातली. विलासराव देशमुख यांच्या आठवणींना उजाळा देताना रितेश यांना अश्रू अनावर झाले. त्यावेळी बंधू अमित देशमुख यांनी रितेशच्या पाठीवर हात ठेवत त्यांना सावरले. अभिनेता रितेश देशमुख यांनी भाषणात बंधू अमित यांना तुमच्याकडून लातूर व महाराष्ट्राला खूप अपेक्षा असल्याचे म्हटले. हा मुद्दा घेऊन अमित देशमुख म्हणाले, मी जिथे आहे, तिथे ठीक आहे. नाळ तोडून इकडे-तिकडे जाणे पटत नाही. पुन्हा एकदा यशवंतरावांपासून विलासरावांपर्यंतचे दिवस आणायचे आहेत, असे सांगितल्याने त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला.

## नाशिक लोकसभा मतदार संघात राजकीय स्थिती बदलली

**नाशिक । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची जागा वाटप अंतिम टप्प्यात येत असतानाच नाशिक लोकसभा मतदारसंघाची जागा भाजपला मिळावी यासाठी पक्षाचे पदाधिकारी सरसावले आहेत. नाशिक जिल्ह्यातील पाच आमदार आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी हा मतदारसंघ भाजपला सोडावा या मागणीचे निवेदन काल दिल्ली येथे पक्षाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना दिले आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघ हा यापूर्वी भाजपाचा लढवीत असे मात्र तत्कालीन खासदार डॉ. दौलतराव आहेर यांनी विधानसभा निवडणूक लढवल्यानंतर हा मतदारसंघ १९९५ च्या सुमारास शिवसेनेला देण्यात आला त्यानंतर या लोकसभा मतदारसंघातून शिवसेना निवडणूक लढवत आहे दरम्यान आता नाशिक जिल्ह्यात मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यानंतर राजकीय स्थिती बदलली आहे नाशिक लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघांपैकी तीन मतदारसंघांमध्ये भाजपाचे आमदार आहेत याशिवाय नाशिक महापालिकेत पूर्ण बहुमताने भाजपाची सत्ता होती, त्रंबकेश्वर नगरपालिकेतही भाजपाची सत्ता होती त्यामुळे या लोकसभा मतदार संघात भाजपाचे प्राबल्य असून आता ही जागा भाजपाला मिळावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.




## जिल्हा दुष्काळसदृश्य परिस्थितीत नव्याने मंडळाचा समावेश

**परभणी । वृत्तसेवा**

खरीप हंगामामध्ये पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ५२ महसूल मंडळांपैकी ३९ मंडळात दुष्काळसदृश्य परिस्थिती राज्य शासनाकडून जाहीर करण्यात आली होती. मात्र त्यानंतर उर्वरित १३ मंडळातील शेतकऱ्यांतून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात राज्य शासनाने नव्याने १३ मंडळांचा समावेश केल्याने आता संपूर्ण जिल्हा दुष्काळसदृश्य परिस्थितीत समाविष्ट झाला आहे. परभणी जिल्ह्यामध्ये यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. विशेष म्हणजे ३२ टक्के पावसाची तूट आढळून आली. त्याचबरोबर जिल्ह्यातील प्रकल्पातील पाणीसाठा तळाला गेला आहे. परिणामी, फेब्रुवारी महिन्यातच भीषण दुष्काळाची चाहूल परभणीकरांना लागली आहे, असे असताना राज्य शासन व जिल्हा प्रशासनाने केलेल्या सर्वे मधून पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ५२ महसूल मंडळांपैकी केवळ ३९ मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली. त्यामुळे उर्वरित १३ मंडळातील शेतकऱ्यांमध्ये राज्य शासनाच्या धोरणाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. परभणी जिल्ह्यापेक्षा इतर जिल्ह्यांमध्ये अधिक पाऊस झाला असतानाही काही ठिकाणी गंभीर तर काही ठिकाणी दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करण्यात आली. परंतु, परभणीतील १३ मंडळाला यामधून वगळण्यात आले. त्यामुळे हे सरकार आपले नाही का? असा संशय या शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला होता. परंतु १६ फेब्रुवारी रोजी राज्य शासनाने राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती घोषित केलेल्या मडळांमध्ये परभणी जिल्ह्यातील १३ मंडळांचा समावेश आहे. त्यामुळे आता जिल्ह्यातील ५२ महसूल मंडळातील शेतकऱ्यांना जमीन महसूलातील सूट,सहकारी कर्जाचे पुनर्गठण, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुली स्थगितीसह वेगवेगळ्या आठ योजनांचा लाभ मिळणार आहे. या शासनाच्या निर्णयाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असला तरी जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती नसून गंभीर दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार या सवलती

जमीन महसूलातील सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठण, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुली स्थगिती

कृषी पंपाच्या चालू विज बिलात ३३ टक्के सूट, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी

रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिशिलथा, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी टँकरचा वापर, शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडित न करणे.

संपादकीय

# पारदर्शी निवडणुका

इलेक्टोरल बाँडसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय कायदेशीर प्रक्रियेतून आला आहे. इलेक्टोरल बाँडची व्यवस्था कशामुळे अस्तित्वात आली, यावर विचार करणे गरजेचे आहे. राजकीय पक्षांना देणगी मिळवण्याचा अधिकार आहे आणि यावर त्यांना कोणताही प्राप्तिकर भरावा लागत नाही. देणगीच्या रुपातून मिळणार्या पैशाची निवडणूक आयोगाला माहिती द्यावी एवढीच अपेक्षा असते. पूर्वी धनादेश किंवा ड्राफ्टच्या माध्यमातून पैसे मिळत असत आणि त्याची माहिती देखील आयोगापर्यंत जात असे. मात्र रोख देणगीच्या बाबतीत पारदर्शकता अजिबातच पाळली जात नव्हती. आपल्याकडे अनेक वर्षांपासून राजकारणात आणि निवडणूक प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात काळा पैसा वापरला जातो आणि ही बाब अर्थातच सर्वश्रूत आहे. त्याचवेळी त्यावर तोडगा काढण्यावरही बरीच चर्चा आणि खल झालेला आहे. दुसरीकडे काळा पैसा देणारी मंडळी राजकीय पक्ष आणि त्यांच्या सरकारकडून वेळोवेळी लाभ उचलत राहिले आहेत. हे चित्र राजकीय व्यवस्थेला मोठे आव्हान देणारे आहे. या पार्श्वभूमीवर इलेक्टोरल बाँडची व्यवस्था आणण्यात आली. काळा पैसा रोखला जावा आणि त्याचे उच्चाटन व्हावे, असा यामागचा उद्देश होता. २०१७ मध्ये भारत सरकारने इलेक्टोरल बाँडची व्यवस्था लागू केली. यानुसार कोणतीही व्यक्ती किंवा संस्था इलेक्टोरल बाँडची खरेदी करू शकते आणि कोणत्याही पक्षाला देऊ शकते. एका निश्चित काळात पक्ष इलेक्टोरल बाँडमधून पैसा काढून घेत असत. पण एखाद्या पक्षाला एखाद्या व्यक्तीने किंवा कोणत्या संस्थेने इलेक्टोरल बाँडच्या माध्यमातून किती देणगी दिली ही माहिती सार्वजनिक करण्याचे बंधन नव्हते. याच तरतुदीवर सर्वोच्च न्यायालयाने आक्षेप घेतला आणि निवडणूक देणगीच्या देवाणघेवाणीत पारदर्शकता असणे गरजेचे असल्याचे मत मांडले. आताच्या निकालाने न्यायालयाने इलेक्टोरल बाँडची विक्री थांबविली आहे. त्याचवेळी भारतीय स्टेट बँकेला इलेक्टोरल बाँडची विक्री थांबवण्याची सूचना दिली. सर्वोच्च न्यायालयाचा आक्षेप मुळातच पारदर्शकतेवरून आहे. इलेक्टोरल बाँड येण्यापूर्वी राजकीय पक्ष ज्या रितीने पैसे गोळा करत होते, त्यात पारदर्शकता नव्हती. त्याचवेळी जी मंडळी रोखीने देणगी देत होते त्यांच्या पैशाचा स्रोत काय होता? त्याचाही शोध घेणे कठीण होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे पालन करत इलेक्टोरल बाँडची व्यवस्था सुरू ठेवली तर कदाचित न्यायालयाला कोणताही आक्षेप नसेल. आपल्या देशात नोंदणीकृत राजकीय पक्षांची संख्या शेकड्यांनी आहे. अशावेळी देणगी गोळा करण्याचे एकच माध्यम ठेवणे आणि त्यानंतर निधीचे समान वाटप करणे ही बाब शक्य नाही. प्रत्येक पक्षाची विचारसरणी वेगळी आहे. मला एखाद्या पक्षाला देणगी द्यायची असेल आणि एखाद्या पक्षाची विचारसरणी मला पटत नसेल किंवा त्याची भूमिका, कार्यक्रम देशाला नुकसानकारक असेल तर त्या पक्षाला देणगी देण्याची इच्छा राहणार नाही. सर्वच पक्षांना सारखाच निधी वाटप झाला तर पक्ष स्थापन करणे हा एकप्रकारचा व्यवसायच होईल. अशा स्थितीत कोणत्या पक्षाला देणगी द्यायची आहे, ही बाब संबंधित व्यक्ती किंवा संस्थेवर अवलंबून असेल. निवडणूक प्रक्रियेत देणगी देण्याचे माध्यम रोखीने असू नये असे अनेकांचे मत आहे आणि त्या मताशी मी देखील सहमत आहे. स्रोतांची माहिती देणार्या व्यक्तींकडूनच देणगी स्वीकारण्याची व्यवस्था असायला हवी. एखाद्या पक्षाला एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने किती रक्कम दिली आहे याबाबतची माहिती देणे कायदेशीररित्या योग्य आहे. सर्वोच्च न्यायालयाला अशीच व्यवस्था अभिप्रेत असेल तर त्याकडे सकारात्मक पाहिले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाचा एखादा निर्णय मान्य न करता सरकारने संसदेत त्यावर पुन्हा कायदा आणण्याचे असंख्य उदाहरणे आपल्याला सांगता येईल. त्याचबरोबर न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत त्यांच्या सूचनांचा कायद्यात समावेश करत दुरुस्ती केल्याचेही अनेक उदाहरणे देता येईल. आता सरकारला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे आकलन करणे आणि विचार करण्यासाठी वेळ हवा आहे. आपल्याला सरकारची बाजू समोर येण्यासाठी वाट पाहणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेल्या आक्षेपांची दखल घेत सरकार सध्याची व्यवस्था अधिक पारदर्शक करण्याचा विचार करत असेल तर त्यानुसार दुरुस्ती आराखडा संसदेत आणता येऊ शकते. मात्र आताच हे काम होऊ शकत नाही. देश हा एक दोन दिवसांसाठी किंवा वर्षासाठी नसतो. देशाचा प्रवास हा सतत सुरू असतो. यात अनेक व्यवस्था अस्तित्वात येतात, बदलतात आणि नष्टही होतात. येत्या काही महिन्यांतच लोकसभा निवडणुका होत आहेत आणि मे महिन्यांत नव्या लोकसभेचे आणि सरकारची निर्मिती होईल. त्यामुळे इलेक्टोरल बाँडच्या मुद्द्यावर तात्पुरत्या दृष्टिकोनातून विचार करता येणार नाही. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाचा असून सरकारने आणि देशाने त्याचा सन्मान करायला हवा. अर्थात यापूर्वी निवडणुकीतील काळ्या पैशाचा महापूर पाहता इलेक्टोरल बाँडची व्यवस्था ही परिणामकारक होती. याच सरकारने ती व्यवस्था आणली आहे आणि आता सर्वोच्च न्यायालयाच्या मतानुसार आणि निर्देशांचे आकलन करता त्यात दुरुस्ती करता येणे शक्य आहे. आपण पुन्हा काळ्या पैशाच्या युगात जाऊ, असे तर होऊ शकत नाही. या व्यवस्थेत पैशाच्या स्रोताचा थांगपत्ता लागत नव्हता आणि देणगीदारही नाही. आजही प्रत्येक निवडणुकीच्या काळात आयोग कारवाईच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात काळा पैसा पकडते. हा पैसा बाहेरून येण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही आणि तसे आयोगाने अनेकदा म्हटले देखील आहे. आपल्या लोकशाही प्रक्रियेत पारदर्शक, निष्पक्षपणे निवडणुका पार पडाव्यात हाच उद्देश व्यवस्थेचा आणि नियमांचा असतो.

# मराठा आरक्षणाचा ४० वर्षांचा संघर्ष ते विशेष अधिवेशन






मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारच्या वतीने मंगळवारी (दि.१९) विधिमंडळाच विशेष अधिवेशन घेतलं जाणार आहे. या अधिवेशनात मराठा आरक्षणासाठी विशेष कायदा केला जाणार आहे. त्यामुळे ४० वर्षाचा संघर्षासाठी उद्याचा दिवस अतिशय महत्वाचा असणार आहे. काय होणार उद्याच्या विशेष अधिवेशनात आणि काय आहे ४० वर्षांचा हा मराठा आरक्षणाचा संघर्ष जाणून घेऊयात. एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत लाखोंच्या संख्येने राज्यात अनेक मोर्चे निघाले. अलिकडच्या काळात मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात लाखोंच्या संख्येने सभा पार पडल्या.एवढच नाही तर मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात लाखोंच्या संख्येने भगव वादळ मुंबईच्या वेशीवर येऊन ठेपल होतं आणि आता पुन्हा एकदा जरांगे पाटील यांचं उपोषण सुरू आहे. यावर तोडगा काढण्यासाठी उद्या विशेष अधिवेशन पार पडणार आहे. मराठा आरक्षण देण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाची स्थापना केली. या आयोगाने राज्यभरामध्ये मराठा समाजाच सर्वेक्षण केलं. त्यानंतर हा अहवाल दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांना सुपूर्द करण्यात आलाय. याच अहवालानुसार आता मराठ्यांना आरक्षण दिल जाणार आहे. मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागासलेला असल्याने घटनेच्या १५(४) आणि १६(४) या अनुच्छेदानुसार आरक्षणास पात्र ठरतो, असा अहवाल राज्य मागासवर्ग आयोगाने दिला आहे. मराठा समाजाला आरक्षण लागू केल्यावर ५० टक्क्यांची आरक्षणाची मर्यादा ओलांडली जाईल. मराठा समाजाला अपवादात्मक परिस्थितीत आरक्षण देण्याची शिफारस राज्य मागासवर्ग आयोगाने केली आहे. त्यानुसार १० ते १२ टक्के आरक्षण उद्या दिली जाण्याची शक्यता आहे. मात्र मराठा आरक्षणाच्या मागणीची इतिहास पाहिला तर तो जवळपास ४० वर्षांचा आहे. या संघर्षात अनेकांना आपल बलिदान ही द्यावं लागल आहे.

मराठा आरक्षणाचा संघर्ष खऱ्या अर्थाने १९८१ मध्ये माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील यांनी सुरू केला. २२ मार्च १९८२ ला अण्णासाहेब पाटील यांनी मुंबईत मराठा आरक्षणासह इतर ११ मागण्यांसाठीचा पहिला मोर्चा काढला. बाबासाहेब भोसले हे तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. मराठ्यांचा हा मोर्चा पाहून सरकारला समस्यांची जाण झाली आणि मराठा आरक्षणाचा निर्णय जाहीर करू अशी ग्वाही दिली. पण दुर्दैवाने सरकार गडगडले आणि आरक्षणाचा निर्णय बासनात गेला. दुसऱ्याच दिवशी अण्णासाहेब पाटील यांनी समाजासमोर जाऊन काय उत्तर देऊ या स्वाभिमानातून डोक्यात गोळी घालून आत्महत्या केली. तेव्हापासून मराठा समाजाच्या संघटित बांधणीला खऱ्या अर्थाने सुरूवात झालं. महाराष्ट्रात १९९५ साली स्थापन झालेल्या पहिल्या राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्या. खत्री यांच्याकडे ज्यावेळी मराठा आरक्षणाचा प्रश्न आला. त्यांनी २००० साली अहवाल सादर केला.ज्या पोटजातींची नोंद मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा अशी आहेत त्यांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देऊ शकता. आयोगाच्या या शिफारशीमुळे मराठ्यांमधील काहींना ओबीसीत प्रवेश मिळाला. मात्र काही त्यापासुन वंचीत राहिले. २००८ साली बापट आयोगाने इतर प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्यासाठी नकार दिला.

बापट आयोगाच्या अहवालानंतर मराठा संघटना आक्रमक झाल्या त्यानंतर आघाडी सरकारने राणी समितीची स्थापना केली. २०१४ च्या निवडणुका जवळ येतात काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारने २१ मार्च २०२३ ला राणी समितीची स्थापना केली. राणे समितीने अभ्यास करून मराठ्यांचं मागासले पण सिद्ध करण्यासाठी पृथ्वीराज चव्हाण तत्कालीन मुख्यमंत्री यांच्याकडे अहवाल सादर केला. नोकरी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण आणि मुस्लिमाना ४ टक्के आरक्षण देण्याच्या शिफारसी सरकारकडे केल्या. पृथ्वीराज चव्हाण सरकारनं या शिफारशी २५ जून २०१४ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्य केल्या. ९ जुलै २०१४ रोजी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (डएइड) प्रवर्ग तयार करण्यात आला.२०१४ मध्ये सामाजिक कार्यकर्ते केतन तिरोडकरआणि इतरांनी या आरक्षणाला विरोध करत न्यायालयात आव्हान दिलं आणि न्यायालयामध्ये हे आरक्षण रद्द झालं. त्यानंतर २०१८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्यायमूर्ती गायकवाड यांची समिती स्थापन केली आणि या समितीने तीन शिफारसी केलेल्या राज्य सरकारने मंजूर केल्या. शिफारशीनुसार उच्च न्यायालयाने मराठा समाजाला १६ टक्क्यांऐवजी सरकारी नोकऱ्यांत १३ टक्के तर शिक्षणात १२ टक्के आरक्षण दिले. त्यानंतर मराठा आरक्षणाच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित करत ॲड. जयश्री पाटील यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली. त्यानंतर सुप्रीम कोर्टात सुनावणी पूर्ण झाल्यानंतर मराठा आरक्षण सुप्रीम कोर्टानं रद्द केलं. त्यानंतर पुन्हा एकदा मराठा संघटना आक्रमक होत रस्त्यावरती उतरून अनेक आंदोलन केली अनेक मोर्चे काढले. या मोर्चानंतर पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वामध्ये हा संघर्ष सुरू झाला मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्यासह ४० वर्षांचा हा संघर्ष आहे. यासाठी अनेकांना आपल बलिदानही कराव लागलय. सरकार बदललं की आश्वासन ही बदलतात आणि नवनवीन पर्यायही शोधले जातात. त्यामुळे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारचा उद्याचा हा पर्याय यशस्वी कसा होणार ? आणि मराठ्यांना आरक्षण कस दिल जाणार हे पाहणं महत्त्वाचं राहील.

# मुख्यमंत्र्यांच्या भाषणावेळी मराठा आंदोलकांकडून घोषणा

**मुंबई । वृत्तसेवा**

शिवजयंतीनिमित्त आज राज्यभरात आज उत्साहाचे वातावरण आहे. महाराष्ट्राचं आराध्यदैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आज, शिवनेरीवर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांच्या हस्ते जन्म सोहळा संपन्न झाला. . शिवजयंतीनिमित्त किल्ले शिवनेरीच्या पायथ्याला पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शिवजयंती सोहळ्यात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी मनोगत व्यक्त केलं. हे राज्य छत्रपती शिवरायांच्या विचारांवर चालणारं राज्य आहे, असं सांगत राज्य सरकार राबवत असलेल्या उपक्रमांबद्दल त्यांनी माहिती दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केलं. मात्र त्यांच्या भाषणादरम्यान शिवनेरीवर मराठा आंदोलकांकडून घोषणाबाजी देखील करण्यात आली. मुख्यमंत्री शिंदे यांचं भाषण सुरू असताना मराठा आंदोलकांनी 'एक मराठा लाख मराठा'च्या घोषणा दिल्या . शिवनेरीवरून उपस्थितांना संबोधित करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणावर मोठं वक्तव्य केल. 'मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी उद्या ( मंगळवार, २० फेब्रुवारी) विशेष अधिवेशन बोलावलं आहे. ओबीस तसेच इतर कोणत्याही समाजघटकाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी हे विशेष अधिवेशन आयोजित करण्यात आलं आहे. ' उद्याच्या अधिवेशनातून मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचं एकनाथ शिंदेंनी जाहीर केलं. शासनाने दांडपट्टा या शस्त्राची 'राज्यशस्त्र ' म्हणून घोषणा केली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. तसेच महाराष्ट्राचे मंत्री सुधीर मुनगंटीवार वाघ नख भारतात आणणार असं देखील मुख्यमंत्री म्हणाले. शिवरायांना अभिप्रेत असलेलं सुराज्य आपल्याला निर्माण करायचं आहे, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

# परभणीचे डॉ.भिसे यांची अधिष्ठातापदी निवड

**परभणी । वृत्तसेवा**

डॉ. सदानंद भिसे यांची नुकतीच सोलापूर वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता पदी निवड झाली आहे.गंगाखेडचे सुपुत्र तथा परभणी येथील वृंदावन कॉलनीत स्थायिक झालेले भिसे यांची डॉ. वेशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर येथे अधिष्ठातापदी निवड करण्यात आली आहे. त्यांनी अधिष्ठातापदाचा पदभारही स्वीकारला. डॉ.सदानंद भिसे यांनी यापूर्वी परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे न्याय वैधकशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख तसेच अधिष्ठाता म्हणून कार्यभार सांभाळला आहे. डॉ.भिसे यांनी यापूर्वी जे.जे. हॉस्पिटल मुंबई येथे वैद्यकीय अधीक्षक म्हणूनही काम पाहिले आहे. तसेच राज्य अवयव प्रत्यारोपण समिती प्रमुख म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. गंगाखेड शहराच्या भूमिपुत्राला वैद्यकीय क्षेत्रात मोठी संधी उपलब्ध झाल्यामुळे डॉ.सदानंद भिसे यांचे गंगाखेड शहर, तालुका व जिल्हाभरातून स्वागत होत आहे.

# स्वाभिमानी लोकसभा स्वबळावर लढविणार

**मुंबई । वृत्तसेवा**

माढा, सांगली, परभणी, बुलढाणा, हातकणंगले आणि कोल्हापूर या सहा लोकसभेच्या जागा स्वाभिमानी संघटना स्वबळावर लढविणार आहे. हातकणंगलेतून राजू शेट्टी, सांगलीतून जिल्हाध्यक्ष महेश खराडे आणि कोल्हापूर लोकसभेच्या रिंगणात स्वत: उतरणार असल्याची माहीती स्वाभिमानीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. जालंदर पाटील यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. तर राज्यातील इतरही लोकसभा लढविण्या संदर्भात अनेकजण संपर्कामध्ये असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. पाटील पुढे म्हणाले की, संघटनेच्या माध्यमातून २५ वर्षापासून शेतकऱ्यांसाठी लढा देण्याचे प्रामाणिक प्रयत्न करत आहे. जनतेने मनात आणले तर राजू शेट्टीसोबत कष्टकरी शेतकऱ्यांचा प्रतिनिधीही जाऊ शकतो. सध्या सुरु असणारे घाणेरडे राजकारण आणि पारंपरिक राजकीय लोकांची संपत चाललेली विश्वासार्हता यामुळे स्वाभिमानीच्या कष्टकरी शिलेदारांना सोबत घेऊन प्राथमिक टप्प्यात सहा जागा लढविणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. राज्यातील अन्य लोकसभेच्या जागासाठीही अनेक राजकीय पक्ष, लोक संपर्कामध्ये असून लवकरच निर्णय घेतला जाईल असेही त्यांनी सांगितले. यावेळी स्वाभिमानीचे अजित पोवार, रमाकांत तोडकर आदी उपस्थित होते.

# गांजा ओढणाऱ्यांना अटक

**नगर । वृत्तसेवा**

शहरात गेल्या काही दिवसांपासून गांजा पिऊन रात्रीच्यावेळी नागरिकांना त्रास देणाऱ्या तिघा जणांना कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेऊन जेलमध्ये डांबले आहे. त्यामुळे गांजाची नशा या तिघांना चांगलीच महामागात पडली आहे. या कारवाईने चोरी छुपे नशा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. कोतवाली पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक प्रताप दराडे यांच्या पथक रात्रीची गस्त घालत असताना क्लेरा ब्रुस, कोठी आणि बॉईज हायस्कुल परिसरात काही जण रात्रीच्यावेळी गांजा पिऊन गोंधळ घालताना आढळून आहे. त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. अमोल प्रदीप कदम ( वय २४, रा. गांधीनगर, बोल्हेगाव, नगर ), योगेश राम सटाले ( वय २९, रा. चिपाडेमळा, सारसनगर), अनिकेत शंकर वाकळे ( वय २१, काटवनखंडोबा परिसर), सोनाथ राजू केदारे ( वय २०, रा. गांधीनगर, बोल्हेगाव ) असे अटक केलेल्यांची नावे आहेत. हे रात्रीच्यावेळी गांजा पिताना



आढळून आली असून, त्यांच्याविरोधात कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वीही कोतवाली पोलिसांनी पुणे बसस्थानक परिसरात गांजा पिणाऱ्यांना ताब्यात घेऊन अटक केली होती.

# पत्रकार विरुध्द जि.प. संघात रोमहर्षक सामना

**बीड । प्रतिनिधी**

आझादी का अमृत महोत्सव निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने दि.१९ फेब्रुवारी पासून आयोजित करण्यात आलेल्या महासंस्कृती महोत्सवाचे उद्घाटन श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुलाच्या मैदानावर मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या प्रसंगी बीड पत्रकार संघ विरुध्द जिल्हा परिषद क्रिकेट संघ यांच्यात सलामीचा क्रिकेट सामना खेळवण्यात आला. या प्रसंगी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते नाणेफेक करुन या सामन्याचा शुभारंभ करण्यात आला. या रोमहर्षक लढतीत पत्रकार संघाने दिलेले धावांचे उद्दिष्ट जि.प. क्रिकेट संघाने एकही फलंदाज बाद न होऊ देता गाठले. या दोन्ही संघातील हा सामना पहाण्यासाठी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे, अप्पर अधिक्षक सचिन पांडकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सांगितदेवी पाटील, अति मुख्य कार्यकारी अधिकारी सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी काकडे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर मोकाटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी केकाण, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी कविता जाधव, तहसिलदार सुहास हजारे, न.प.मुख्याधिकारी निता अंधारे यांच्यासह महसुल, पोलीस आणि जि.प.चे अधिकारी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. पत्रकार संघाने नाणेफेक जिंकल्यानंतर फलंदाजीचा निर्णय घेतला मात्र भेदक गोलंदाजीपुढे फलंदाजांचा टिकाव लागला नाही. कर्णधार सुशील देशमुख यांनी दोन चौकाराच्या मदतीने १३ धावा केल्या. पत्रकार संघ विरुद्ध जिल्हा परिषद क्रिकेट संघ यांच्यात झालेल्या या सामन्यात जिल्हा परिषद क्रिकेट संघाने कर्णधार गणेश सारुक व उप कर्णधार लक्ष्मण काकडे यांच्या नेतृत्वाखाली विजयी सलामी दिली. या सामन्यात राजेश मस्के राजू राठोड यांच्या चमकदार गोलदाजीच्या जोरावर व फलंदाज विश्वास जावळे आणि सतीश वाघमारे यांनी संघास विजय मिळवून दिला.

# तलाठी भरती घोटाळ्यातील उमेदवारांवर गुन्हे दाखल

**नागपूर । वृत्तसेवा**

लातूर येथील गुरू ऑनलाईन एक्झाम सेंटर येथे परीक्षा देणाऱ्या दोन उमेदवारांविरुद्ध धाराशिव येथील आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे दोघेही निवड यादीत टॉपर आहेत. तलाठी भरतीसाठी दहा लाखांपेक्षा जास्त उमेदवारांनी अर्ज केले होते तर सरासरी आठ लाख उमेदवारांनी परीक्षा दिली होती. अनेक कारणांनी तलाठी भरती चर्चेत होतीच पण आता तलाठी भरती घोटाळ्याला निर्णायक वळण मिळाले आहे. लातुरातील अख्खे परीक्षा केंद्रच मॅनेज असल्याची माहिती समोर आली आहे. तलाठी भरतीत ४,६०० पेक्षा जास्त पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आणि टीसीएस आयओएन कंपनी मार्फत परीक्षा घेण्यात आल्या होत्या. परीक्षेनंतर ५ जानेवारी २०२४ रोजी सर्व उमेदवारांच्या गुणांचे सामान्यकरण करून जिल्हानिहाय निवड याद्या जाहीर करण्यात आल्या होत्या. लातूर शहरातील गुरू ऑनलाईन परीक्षा केंद्रात गैरप्रकार झाल्याचे समोर आले आहे. परीक्षा केंद्रातील कर्मचारी किंवा केंद्राचा मालक यात सहभागी असल्याचा संशय निर्माण झाला आहे. स्पर्धा परीक्षा समन्वय समितीकडे धाराशिव जिल्ह्यातील तलाठी भरतीत टॉपर असलेल्या काही उमेदवारांबाबत अनेक पुरावे होते, त्यांनी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयाला याबाबत विस्तृत तक्रार दिली



होती. परीक्षा देणाऱ्या उमेदवाराच्या कॉम्प्युटरचा एक्सेस एनी डेस्क, टीम व्ह्युअर किंवा तत्सम सॉफ्टवेअरचा वापर करून दुसऱ्या कॉम्प्युटरवर देण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले होते. तलाठी भरतीत लातूर येथील परीक्षा केंद्रावरून महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षा दिली होती. पण फक्त धाराशिव येथील टॉपर उमेदवारांवर कार्यवाही झाली आहे. परंतु इतर जिल्ह्यातील टॉपरसुद्धा यात सामील असल्याने त्यांची चौकशी कधी असा प्रश्न स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने विचारला आहे. त्या शिफ्ट मधील ०.१% टॉपर उमेदवारांचे गुण सामान्यकरण प्रक्रियेत वापरले गेले होते, पण आता टॉपर उमेदवारच घोटाळेबाज असल्यामुळे दिलेल्या गुणांच्या आधारे तलाठ्यांना नियुक्त्या देणार तरी कशा असा सवाल उमेदवार विचारात आहेत. सदर गैरप्रकाराचा तपास न्यायालयीन चौकशी समितीव्दारे करावा म्हणून याआधीच मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. आता उच्च तंत्रज्ञानाने घोटाळा झाल्याचे उघडकीस आल्याने या पदभरतीचा तपास एसआयटीव्दारे करावा अशी मागणी होत आहे. धाराशिव तहसीलदार निलेश काकडे यांच्या तक्रारीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात मयूर दराडे आणि प्रमोद केंद्रे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा २९ आगस्ट २०२३ ला लातूर सेंटरवर घडला. तलाठी भरतीत लातूर येथील एक परीक्षा केंद्र त्या परीक्षा केंद्राच्या मालकानेच मॅनेज केले होते. वेगवेगळ्या प्रकारचे सॉफ्टवेअर आणि तंत्रज्ञान वापरून उमेदवारांचे पेपर सोडविल्या गेले आहेत. महाराष्ट्रातील तलाठी भरतीमधील अनेक जिल्ह्यांतील टॉपर लातूर केंद्रावरून गैरप्रकार करून उत्तीर्ण झाले आहेत. परीक्षा केंद्राशी निगडित व्यक्तीचा पुतण्या, बहीण आणि इतर नातेवाईकांना गैरप्रकार करून उत्तीर्ण करण्यात आले आहे. आता आम्ही फक्त धाराशिव जिल्ह्यातील टॉपरबद्दल खुलासा केला आहे, येत्या काळात इतर जिल्ह्यांतील टॉपरबद्दल पुरावे सादर केले जातील. आमच्याकडे आता अनेक पुरावे असून याबाबत आम्ही उच्च न्यायालयात याचिकासुद्धा दाखल केली आहे. इतका मोठा घोटाळा झाला असतानाही महसूल विभाग घोटाळेबाजांना नियुक्त्या देणार आहे. त्यामुळे या घोटाळ्याची एसआयटी चौकशी झाल्याशिवाय कोणालाही नियुक्त्या देण्यात येऊ नये, अशी मागणी स्पर्धा परीक्षा समन्वय समिती अध्यक्ष राहुल कवठेकर यांनी केली आहे.

## भाजपने संविधानाची चिरफाड केली –सुळे



**पुणे । वृत्तसेवा**

डोणजे हे ग्रामीण भाग असला तरी शहराचाच भाग झाला आहे. या भागात कचरा व्यवस्थापन, मैला शुद्धीकरण प्रकल्प करणे आवश्यक आहे. महागाई वाढली, पुण्याचं ट्रॅफिक वाढलं, पाण्याचा प्रश्न , विजेचा प्रश्न सुटला नाही. २०० आमदार, ३०० खासदार असून भाजपने कोणते मोठे प्रश्न सोडवले? भ्रष्टाचार तर ऑफिसीयल केला आहे. एका विचाराची पुण्यात सत्ता असून देखील पुणेकरांचे आयुष्य सुधारले नसल्याची टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. वारजे येथील पुणे महानगरपालिकेच्या मैलापाणी शुद्धीकरण प्रकल्पाच्या कामाची पाहणी रविवारी (दि.१८) खासदार सुळे यांनी केली. त्यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. सुळे म्हणाल्या, डोणजे पासून खडकवासला धरणापर्यंत पाण्यामध्ये प्रदूषण वाढत चालले आहे. मी वारंवार सर्वांकडे याबाबत मागणी केली आहे. पुणे महापालिकेने हवे तेवढं लक्ष याकडे दिलेलं नाही. पण या भागात जर प्रदूषण वाढले याचे दूरगामी परिणाम सर्व पुण्यातील नागरिकांवर होणार आहेत. पुणे महापालिका प्रशासनाकडून अपेक्षित काम झालेलं नाही. प्रदूषण वाढत आहे. महापालिकेने एक वेळ निश्चित करून काम करावे. आरक्षणाच्या प्रश्नावर सुळे म्हणाल्या, धनगर, लिंगायत, मुस्लिम समाजाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. धनगर समाजाला आरक्षण देऊ फडणवीस बारामती मध्ये येऊन बोलले होते. पण ते अजूनपर्यंत ही मिळालेले नाही. मनोज पाटील यांचे आंदोलन उभ्या राज्याने पाहिलं आहे. मराठा समाजाला त्यांना अपेक्षित असे आरक्षण मिळालेले नाही. सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की ज्या माणसाने पक्ष स्थापन केला.

## टाईपच्या परीक्षेत गैरप्रकार

**बीड । वृत्तसेवा**

टाईप च्या परीक्षेत बीड जिल्ह्यात मोठा गैरप्रकार झाल्याचे उघड झाले आहे. तब्बल ८५ विद्यार्थ्यांनी घरी बसून परीक्षा दिल्याचे समोर आले आहे.या प्रकरणी केवळ एका शिक्षकावर गुन्हा दाखल करून प्रकरण मॅनेज करण्याचा उद्योग सुरू आहे.वास्तविक पाहता परीक्षा केंद्र,केंद्रप्रमुख आणि परीक्षा विभाग यांची चौकशी झाल्यास मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता आहे. डिसेंबर महिन्यात झालेल्या टाईप च्या परीक्षेत परीक्षा केंद्रात गैरहजर असतानाही ८५ विद्यार्थ्यांची ऑनलाइन हजेरी होती. हे विद्यार्थी घरीच होते किंवा त्यांच्या जागी दुसऱ्यानेच परीक्षा दिल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. हा प्रकार २० डिसेंबर २०२३ रोजी बीडच्या आदित्य इंजिनिअरिंग महाविद्यालयात घडला आहे. या प्रकरणात एका शिक्षकाविरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांत टंकलेखन परीक्षा घेतल्या जातात. १८ डिसेंबर २०२३ पासून ही परीक्षा बीडमध्ये तीन केंद्रांवर घेण्यात येत होती. यामध्ये आदित्य इंजिनिअरिंग महाविद्यालयात एक केंद्र होते. येथे केंद्र संचालक म्हणून फैजल हमद चाऊस, तर आयटी टीचर म्हणून पी.एस. नागरगोजे यांची नियुक्ती केली होती. २० डिसेंबर २०२३ रोजी दुपारी १:१५ ते २:४५ या दरम्यान एका विद्यार्थ्याने अवघ्या ३० मिनिटांत पाचही सेक्शन (थेरी, ई-मेल, लेटर, स्टेटमेंट, स्पीड पॅसेज) सोडविल्याचे दिसले. त्यावेळी परिषेदच्या अध्यक्षांना याबाबत संशय आल्याने त्यांनी केंद्र संचालकांना खात्री करण्यास सांगितले. यावर चाऊस यांनी खात्री केल्यावर परीक्षा केंद्रात २० विद्यार्थी हजर दिसले, तर ऑनलाइन हजेरीत ३३ विद्यार्थी हजर होते. इतर १३ विद्यार्थी हे अन्य ठिकाणी बसून परीक्षा देत असल्याचे समजताच परिषदेच्या अध्यक्षांनी याचा अहवाल मागविला.

## केज तालुक्यात दरोडा

केज - कळंब - अंबाजोगाई रस्त्यावरील युसूफवडगाव बोरीसावरगाव ( ता. केज ) येथील दोन पेट्रोल पंपावर अज्ञात दरोडेखोरांनी धारदार शस्त्राचा धाक दाखवून दरोडा टाकला. दोन्ही पेट्रोल पंपाचे अंतर हे १५ किलोमीटर एवढे असताना अवघ्या २० मिनिटाच्या अंतराने दोन पेट्रोल पंप लुटून ३ लाख ६० हजार ७० रुपयांची रक्कम घेऊन पोबारा केला. याप्रकरणी युसुफवडगाव पोलिसात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. युसुफवडगाव येथील शिवरुद्र चोपणे यांच्या शुभम पेट्रोलियम सर्व्हिसेस या पेट्रोल पंपावर १६ फेब्रुवारी रोजी रात्री ११.२३ वाजेच्या सुमारास दोन मोटार सायकलवरून आलेल्या चौघांनी पेट्रोल पंपाच्या कार्यालयाचा काचेचा दरवाजा फोडून मॅनेजरला कुकरी सारख्या धारदार तीक्ष्ण हत्यारांचा धाक दाखवून टेबलच्या ड्रॉवर मधील २५ हजार ३०० रुपयांची रक्कम काढून घेतली. तसेच बाहेर पंपावर वाहनात इंधन भरीत असलेल्या कामगारांच्या खिशातील नगदी पैसे काढून घेऊन मोटार सायकलवरून अंबाजोगाईच्या दिशेने पळून गेले. त्यानंतर पळून जात असताना याच रस्त्यावर पुढे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या बोरीसावरगाव येथील विश्वनाथ सोमवंशी यांच्या सोमवंशी पेट्रोल पंपावरही त्यांनी दरोडा टाकला. त्या पेट्रोल पंपाच्या कार्यालयाच्या दरवाजाचा काच फोडून मॅनेजरला धारदार शस्त्राचा धाक दाखवून टेबलच्या ड्रॉवरमधील नगदी ३ लाख ३४ हजार ७७० रुपये घेऊन चोरट्यांनी पोबारा केला. या घटनेची माहिती युसुफवडगाव पोलिसांना मिळताच त्यांची दरोडेखोरांचा पाठलाग केला. परंतु अंधाराचा फायदा घेऊन दरोडेखोर पसार झाले. याप्रकरणी शिवरुद्र चोपणे यांच्या फिर्यादीवरून अनोळखी चार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्र शेंडगे हे पुढील तपास करीत आहेत.

## खा.हेमंत गोडसे यांच्या कारला दिल्लीत अपघात

**नाशिक । वृत्तसेवा**

नाशिकचे खासदार हेमंत गोडसे यांच्या कारला दिल्लीतल्या बी.डी. रोड या ठिकाणी अपघात झाला आहे. या कार अपघातात हेमंत गोडसे यांच्या कारचं मोठं नुकसान झालं आहे. या अपघातातून सुदैवाने हेमंत गोडसे आणि त्यांच्यासह असलेले सहकारी बचावले आहेत. या अपघातात कारचं मोठं नुकसान झालं आहे. नाशिकचे खासदार दिल्लीतल्या बी. डी. मार्गावरुन चालले होते. त्याचवेळी हा अपघात झाला. कारचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. हेमंत गोडसे आणि त्यांचे सहकारी या अपघातातून बचावले आहेत. दरवर्षी शिवजयंतीच्या दिवशी हेमंत गोडसे हे महाराष्ट्र सदनात येत असतात. त्यानुसार ते दिल्लीत येत होते. मात्र त्यांच्या कारला आज अपघात झाला आहे. खासदार हेमंत गोडसे यांची कार एका कारला ओव्हरटेक करत होती. त्यावेळी समोरून येणाऱ्या एका वाहनाने त्यांच्या कारला धडक दिली आणि हा अपघात झाला. कारचं मोठ्या प्रमाणावर नुकसान या अपघातात झालं आहे.हेमंत गोडसे हे त्यांच्या चक १५ ऋउ ९९०९ या इनोव्हाने प्रवास करत होते. त्यावेळी त्यांच्या कारला अर्टिगा ७ उथ २२०२ या गाडीने जोरदार धडक दिली. यामुळे कारचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं. मात्र सुदैवाने गोडसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मोठी दुखापत झाली नाही. देशभरात शिवजयंतीचा उत्साह आहे. राजधानी दिल्लीतही शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचं नियोजन करण्यात आलं आहे. नाशिकचं ढोल पथक या शिवजयंती सोहळ्याला दरवर्षी उपस्थित असतं.

## लोकसभा निवडणुकींसाठी काँग्रेसची मुंबईत बैठक

**मुंबई । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने संभाव्य उमेदवारांसाठी चाचपणी सुरू केली आहे. त्यानुसार राज्यातील उमेदवारांची प्राथमिक यादी तयार करण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेसच्या छाननी समितीची विशेष बैठक येत्या २२ फेब्रुवारी मुंबईत आयोजित करण्यात आली आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते मधुसूदन मिस्त्री हे या बैठकीला उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीत महाराष्ट्रातील उमेदवारांची चाचपणी पूर्ण करून ही यादी दिल्लीत निवडणूक समितीकडे दिली जाणार असल्याचे सांगितले जात आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे जागा वाटप सध्या अंतिम टप्प्यात असल्याचे बोलले जात आहे. काँग्रेसकडून काही दिवसांपूर्वीच मतदारसंघ निहाय समन्वयकांची आणि निरीक्षकांची यादी



काही दिवसांपूर्वी जाहीर केला होता. या समन्वयक आणि निरीक्षकांनी नुकताच अहवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सादर केला होता. या अहवालबाबत गेल्या अनेक बैठकीत चर्चा करण्यात आली असून त्यानंतर साधारणपणे इच्छुक मतदारसंघाची यादी तयार करण्यात आली होती. अखेर आता पक्षाने उमेदवारांची चाचपणी सुरू केली असल्याचे सांगण्यात येते. शिक्षकांना निवडणुकीच्या कामाला लावलं, राज ठाकरे भडकले; म्हणतात, निवडणूक आयोग पाच वर्ष झोपा काढत होतं का? यानुसार राज्यातील काँग्रेसच्या इच्छुक उमेदवारांची प्राथमिक यादी निश्चित करण्यासाठी २२ फेब्रुवारी रोजी पक्षाच्या छाननी समितीची बैठक मुंबईत आयोजित करण्यात आली आहे. मिस्त्री यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक आयोजित करण्यात आली असून या बैठकीला काँग्रेस प्रदेशाध्यक्षा नाना पटोले यांच्यासह महाराष्ट्रातील इतर बडे नेते उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत उमेदवारांच्या नावाबाबत चर्चा केली जाणार असल्याचे कळते.

## पर्यटन क्षेत्र विकासित करण्याचा सरकारचा प्रयत्न –मुख्यमंत्री

**पुणे । वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकोट किल्ले हे आपला ठेवा असून तो जपण्याचा प्रयत्न नक्की करू. पहिल्या टप्प्यात शिवाजी महाराजांशी संबंधित विविध २० पर्यटन स्थळे विकसित होत आहेत, त्यात किल्ले रायगडाप्रमाणेच शिवनेरीचाही विकास करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार अमोल कोल्हे, आमदार अतुल बेनके यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी वास्तुकला, अभियांत्रिकी, किल्ल्यावरील प्रत्येक थेंब पाण्याचा उपयोग करून घेण्याची दूरदृष्टी त्या काळी दाखवली. शिवछत्रपती म्हणजे पराक्रम, शौर्य, त्याग, समर्पण आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व होते. ते सर्वव्यापी होते आणि त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम केले. ते युगपुरुष, युगप्रवर्तक आणि रयतेचे राजे होते. अठरापगड जातीचे, धर्माचे लोक त्यांनी एकत्र आणले. प्रजेच्या दुःखापुढे, कल्याणापुढे स्वतःचे दुःख, आराम कवडीमोल मानला. त्यांनी तलवार हाती घेतली पण निष्पापांच्या रक्ताने रंगू दिली नाही. त्यामुळे त्यांच्या तलवारीला रक्ताचा वास येत नाही तर मानवतेचा सुगंध येतो. ते केवळ व्यक्ती नाही तर विचार होते.

## शासकीय नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत फसवले

**नागपूर । वृत्तसेवा**

इंजिनिअरिंग झालेल्या नातवाला शासकीय नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत तीन व्यक्तीनी युवकाच्या ७० वर्षीय वृद्ध आजीकडून तब्बल २१ लाख ५० हजार रुपये घेऊन फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. ही घटना नागपूरच्या हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत २५ ऑक्टोबर २०२१ ते ५ ऑक्टोबर २०२३ दरम्यान घडली. मात्र या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे उशीरा लक्षात आल्याने पीडित तरुणाने हुडकेश्वर पोलीस स्टेशन (छरसाीी झेश्रळलश) गाठून तक्रार दिली आहे. गिरीधर पंढरीनाथ अंबर्ते (४५, रा. सतनामीनगर, सीए रोड नागपूर), कैलास जाधव (४०, रा. विजयनगर, नालंदानगर, खामगाव रोड, बुलढाणा) आणि अमोल पाटील (६०, रा. पीएमटी बस डेपोजवळ, कोथरूड पुणे) अशी फसवणूक केलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. तर विमल सुधाकर हिवसे (७०, रा. गजाननगर, मानेवाडा बेसा रोड) असे फसवणूक झालेल्या वृद्ध महिलेचे नाव आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंदवून फसवणूक करणाऱ्या आरोपींचा शोध सुरू केला आहे. विमल यांचा मुलगा संजय सुधाकर हिवसे (४५) याचा मित्र असलेला संशयित आरोपी गिरीधरचे त्यांच्या घरी नेहमीच येणे-जाणे होते. गिरीधर हा नेहमीच आपली विविध क्षेत्रातील मोठमोठ्या अधिकाऱ्यांसोबत ओळख असून आपण अनेक मुलांना शासकीय नोकरी लावून देत असल्याची बतावणी केली. विमल यांचा नातू यश संजय हिवसे (२१) याने इंजिनिअरिंग केले असून तो सध्या नोकरीच्या शोधात आहे. गिरीधरने यांच संधीचा फायदा घेत मी नोकरी लावून देईल असे यशला आश्वस्त केले.

## भागुजीराव ढेकळे विद्यालयात इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा आणि इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए.एस.हे होते. कृषि पंडित भागूजीराव ढेकळे विद्यालयात शनिवार दि.१७ रोजी इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने निरोप देण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प.राम महाराज शास्त्री एकलिंगेश्वर संस्थान पाडळसिंगी, गेवराईचे पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर, सरपंच रितेश साबळे, उपसरपंच विकास चौधरी, गिन्यानदेव चौधरी, बाबासाहेब दाभाडे, रामराव मोहोळकर, बळीराम साबळे, रघुनाथ दाभाडे, लक्ष्मण दाभाडे, हनुमान कोठेकर, शिवनाथ फुलझळके, दिपक लाटे, शेख यासीन, शिवाजी दाभाडे, विनायक नन्नवरे, राम भांडवलकर, पत्रकार धनंजय बजगुडे, सय्यद जुबेर, परमेश्वर पौळ आदि उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात नम्रता भांडवलकर, प्रगती भांडवलकर, सय्यद इकरा, पठाण अल्फीया यांच्या स्वागतगिताने झाली. या प्रसंगी ह.भ.प.राम महाराज, भोसले आर.पी.,परमेश्वर पौळ, रितेश साबळे, कैलास टोंपे, हर्षदा लोखंडे, श्वेता चव्हाण, सुमित बाकले, आदिती शिंदे, समृध्दी लोखंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेत घेण्यात आलेल्या विविध क्रिडा स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी बोलतांना प्रविणकुमार बांगर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी परिक्षा शांततेत आणि सुरळीत द्यावी. ज्या काही अडचणी असतील त्या सोडविण्यासाठी मी परिसरातील प्रत्येक सेंटरला भेट देणार आहे असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात थिटे ए.एस.म्हणाले की, १२ वी नंतर पुढील शिक्षणासाठी आई-वडिल आणि शिक्षकांचे मार्गदर्शन उपयोगी पडेल. आपण ज्या ठिकाणी आहात त्या ठिकाणी सुसंस्कृत होवुन चांगला अभ्यास करून करियर घडवावे. जे काम आपण करतो ते जिद्द आणि चिकाटीने व प्रामाणिकपणे केले पाहिजे. विविध परिक्षेत चांगले गुण घेवून आपण आपल्या कुटूंबियांचा आणि गावचा नावलौकिक मिळवला पाहिजे. जेवढे क्षेत्र आहेत त्या बाबत माहिती विद्यार्थ्यांना दिली असल्याचे सांगुन विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश पोकळे यांनी केले तर सुत्रसंचालन चंद्रशेखर जामकर यांनी केले. शेवटी रामदास घोरड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## दिलीप गोरे यांच्या बीआरएस जिल्हा समन्वयक पदाचा राजीनामा

**बीड । प्रतिनिधी**

भारत राष्ट्र समितीचे बीड जिल्हा समन्वयक तथा माजी नगराध्यक्ष दिलीप गोरे यांनी आपल्या बीआरएस जिल्हा समन्वयक समन्वयक पदाचा राजीनामा दिला असुन सहकार्याशी विचार विनिमय करून लवकरच पुढील निर्णय घेणार असे प्रसिद्धी पत्रकार द्वारे कळविले आहे. प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात दिलीप गोरे म्हणाले की गेल्या एक वर्षापासून बीआरएस पक्षामध्ये प्रवेश घेऊन भारत राष्ट्र समिती बीड चा जिल्हा समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडत आहे. बीड जिल्ह्याभरात भरात भारत राष्ट्र समितीचे संघटन उभे करत असताना मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी पन्नास हजारापेक्षा जास्त सदस्यांची नोंदणी केली असून बीड जिल्हा भरात पक्षात कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केली आहे... केसीआर साहेबांच्या २० एप्रिल २०२३ रोजीच्या छत्रपती संभाजीनगर येथील सभेला बीड विधानसभा कार्यक्षेत्रातून पाचशे गाड्या आणि जिल्हाभरातून जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी हजारो गाड्यांचा ताफा घेऊन हजारो कार्यकर्त्यांसह उपस्थिती दर्शविली होती. मला बीड विधानसभा मतदार संघातून आमदारकीची निवडणूक लढवायची असून ही बाब केसीआर साहेबांसह महाराष्ट्रातील बीआरएस च्या सर्व प्रमुख नेत्यांना माहिती आहे. या अनुषंगाने बीड जिल्ह्यामध्ये आणि बीड मतदार संघामध्ये बी आर एस पक्षाचे संघटन करण्याचे काम चालू होते. परंतु मागील तेलंगणातील झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाला आलेले अपयश आणि केसीआर साहेबांना झालेल्या अपघातामुळे महाराष्ट्रातील पदाधिकारी यांच्या समवेत नेतृत्वाचा संपर्काचा अभाव झालेला आहे. महाराष्ट्रातील इतर सर्वच पक्षांनी महाराष्ट्रासह देशभरात लोकसभेच्या निवडणुकीची आपआपले उमेदवार निश्चित करून जय्यत तयारी चालू आहे. इतर पक्षाचे जवळपास उमेदवार हे निश्चित झालेले आहेत. या सर्व परिस्थितीत गेल्या चार महिन्यापासून पक्षाची पुढील रणनीती याबाबत बी आर एस पक्षाची महाराष्ट्राची अद्याप पर्यंत महाराष्ट्रात अथवा हैदराबाद येथे बैठक झालेली नाही. त्यामुळे पुढील राजकीय बांधणी आणि निवडणूक याबाबत माझी व कार्यकर्त्याची अवस्था संभ्रमित निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात बी आर एस पक्ष नेतृत्वहीन आणि दिशाहीन झाला असून भविष्यातील पक्ष बांधणीचे व निवडणूक लढण्याचे कुठलेच नियोजन पक्षाकडे दिसत नसल्याने मला हा निर्णय घ्यावा लागत आहे. माजी मुख्यमंत्री माननीय के. चंद्रशेखर राव साहेबांनी तेलंगणा राज्याचा शेती-शेतकरी बांधवासह राज्यातील सर्व घटकांचा उत्तम पद्धतीने विकास केलेला आहे या गोष्टी पक्ष प्रवेश करत असतानाही भावल्या होत्या व आज पक्ष सदस्यत्वाचा पक्षाचा राजीनामा देताना त्याच भावना कायम आहेत. माननीय के.चंद्रशेखर रावसाहेब त्यांच्या कार्याबद्दल आदर आहे व भविष्यातही कायम राहील. केवळ बी आर एस कडून कुठल्याही प्रकारचा महाराष्ट्रासाठी राजकीय अजेंडा, सामाजिक अथवा निवडणुका बाबतचा कुठलाही कार्यक्रम समोर येत नसल्याने मला माझ्या व सोबतच्या सर्व सहकाऱ्यांच्या भविष्यासाठी हा निर्णय घ्यावा लागत आहे. पक्षात असताना पक्ष नेतृत्वाकडून व आपणा सर्व सहकाऱ्यांकडून मिळालेले प्रेम,सहकार्य याबद्दल मनापासून आभारी आहे. तरी माननीय नेतृत्व महोदयांना विनंती आहे की, आजच्या दिवसापासून मी बीआरएस पक्ष आणि पदमुक्त होत आहे. माझा पाठवलेला पक्ष सदस्यत्वाचा व जिल्हा समन्वयक पदाचा राजीनामा स्वीकारावा ही विनंती.



# छत्रपती शिवाजी महाराज जयंती जिल्हाभर साजरी -जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४वी जयंती आज जिल्हाभर प्रचंड उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळयाच्या ठीकाणी मुख्य शासकीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, निवासी उपजिल्हाधिकारी शिव कुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी शैलेश




सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, नगर परिषद प्रशासक बी.डी. बिक्कड, नगर परिषद मुख्याधिकारी नीता अंधारे जिल्हा परीषदेच्या प्रकल्प संचालक संगीता पाटील, नगर परिषद बीड उपमुख्याधिकारी सम्राट कदम तहसीलदार सुहास हजारे, व इतर प्रशासकीय अधिकारी व विभाग प्रमुख उपस्थित होते. उपस्थित अधिकाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी पोलीस बँड पथकाच्याद्वारे राष्ट्रगीत व राज्यगीत गायनव्दारे मानवंदना देण्यात आली. के.एस.के. कॉलेजच्या संगीत विभागाच्या समुहाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर आधारित पोवाडा, शिववंदना आणि आरती सुमधुर आवाजात सादर करून वातावरण शिवमय केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दीपक खळगे यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळा परिसर नगर परिषद बीड द्वारे स्वच्छता करून परिसरात रंगरंगोटी, सुशोभीकरण व विद्युत रोषणाई करण्यात आली. शहरातील नागरीकात शिव जयंती निमित्त्प्रचंड उत्साह असुन याठिकाणी सकाळीपासुनच अभिवादनासाठी गर्दी होती. जिल्ह्यातील विविध संस्थेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने शहराला सजविण्यात आले.





**बीड : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व बाजीराव चव्हाण जनसंपर्क कार्यालय बीड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करुन बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जयंती साजरी करण्यात आली.**

## मराठा आरक्षणासाठी आंदोलकांचा रास्ता रोको

मराठा आरक्षणातील कुणबी प्रमाणपत्राबाबत सगेसोयरे कायदा लागू करण्यात यावा या प्रमुख मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवली (ता.अंबड जि.जालना) येथे सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आणि संविधानिक पदावरील सरकार मधिल मंत्री बेजबाबदार संवेदनाहीन वक्तव्य करत मराठा समाजाच्या भावना दुखवत आहेत यांच्या निषेधार्थ मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१८ रविवार रोजी सकाळी अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. 'एक मराठा लाख मराठा लढेंगे जितेंगे हम सब जरांगे 'आरक्षण आमच्या हक्काचंघोषणांनी परिसर दुमदुमून गेला.निवेदन नेकनुर पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक अजय पानपाटील,मंडळ अधिकारी अशोक डरपे यांच्या मार्फत जिल्हाप्रशासनाला देण्यात आले.

## यशवंत विद्यालयात गुणवतांचा सत्कार

देगलूर - तालुक्यातील ग्रामीण भागातील नामवंत शाळा म्हणजे गवंडगाव नगरीतील यशवंत माध्यमिक विद्यालय आहे. दि १५ फेब्रुवारी रोजी बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत श्री सेवालाल महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून, चझडउ मध्ये येथील यश संपादन केलेल्या दोन गुणवंत विध्यार्थ्यांचं सत्कार व मार्गदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. श्रीकांत ठिकाणे व योगेश पाटील या दोघंच सन्मान संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव वरखिंडे यांच्या वतीने करण्यात आला.शाळेतील विध्यार्थ्यांना ठिकाणे व पाटील यांनी स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केले. त्याच बरोबर शाळेतील विद्यार्थ्यांनी सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त त्याच्या जीवन चरित्रयावर प्रकाश टाकला. यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष शिवाजी वरखिंडे यांनी म्हणाले कि आमच्या विद्यालयातील विध्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, पोलीस उपनिरीक्षक,शिक्षक, पत्रकार, आर्मी आदी क्षेत्रामध्ये सद्या कार्यरत आहेत. एक सांगायचं म्हणजे शाळेपासून ४ कि.मी अंतरावर असलेल्या शिवणी गावातील दोन सख्खे भाऊ एकाच वेळी अजय व अक्षय यांची पोलीस उपनिरीक्षक म्हणून निवड झाली.

## साई संस्थान येथे ज्ञानयज्ञ सोहळयास उत्साहात

गेवराई - तालुक्यातील तलवाडा येथील श्री साईबाबा मंदिर संस्थान याठिकाणी संत-महंत तसेच हभप नवनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली साई मंदिर वर्धापन दिनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत महापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळयास शुक्रवार दि.१६ फेब्रुवारी रोजी प्रारंभ झाला असून श्रीमद् भागवत कथेचे वाचन कथा प्रवक्ते हभप रविदास महाराज चव्हाण यांच्या अमृततुल्य वाणीतून दररोज दुपारी २ ते ५ यावेळेत सुरू आहे. तरी तलवाडा व परिसरातील भाविकांनी कथा श्रवणाचा व रात्री ९ ते ११ यावेळेत हरिकिर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाचा लाभ घेऊन आनंद द्विगुणित करावा असे आवाहन साई स्वराज्य ग्रुप व श्री साईबाबा मंदिर संस्थान यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शांताई अर्बनमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती शांताई अर्बन मध्ये साजरी दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी शिवजयंती मा.श्री.हेमंतजी क्षीरसागर ,(उपनगराध्यक्ष न.प. बीड),डॉ. सचिन कोल्हे,डॉ. मितेश गवते,डॉ. अशोक मोरे,श्री.अभिजीत जगताप,सतीश गलधर,स्वप्निल शेलके,आकाश गाडे. यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय राजे आणि मराठा साम्राज्याचे संसथापक होते विजापूर च्या ढासळत्या आदिलशाही मधून शिवरायांनी स्वतः चे स्वतंत्र राज्य निर्माण केले असे मत मा.श्री.हेमंतजी क्षीरसागरनी मांडले स्वतंत्र साम्राज्याचे स्वप्न साकार करणारे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी राजे भोसले हे एक कर्तृत्वान थोर पुरुष होते त्यांनी शून्यातून केलेली स्वराज्य निर्मिती ही सर्वासाठी प्रेरणा दायी आहे शिवाजी महाराज हे आदर्श वत स्वराज्य कारभार करण्यात यशस्वी ठरलेले महाराष्ट्राचे छत्रपती आहेत असे मत शाताई अर्बन चे संस्थापक डॉ.डी बी शिंदे सरांनी व्यक्त केले.

## जिल्हाधिकारी मुधोळ यांच्याहस्ते स्पर्धांचे उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. याचाच एक भाग म्हणुन बीड जिल्हयात क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. आज जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी जिल्हा क्रीडा संकुल येथे मशाल पेटवुन क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन केले. जिल्हा क्रीडा संकुल येथे आज क्रीडा स्पर्धांतर्गत विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. क्रीडा स्पर्धा कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते झाले. या क्रिडा स्पर्धा आजपासून २१ फेब्रुवारीपर्यंत असणार आहेत. आज उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी जिल्हाधिकारी यांनी बॅटींग केली तर नगरपरीषदेच्या मुख्याधिकारी यांनी बॉलींग केली. प्रथम सामना जिल्हा परिषद बीड क्रिकेट संघ आणि पत्रकार क्रिकेट संघ यांच्यात रंगला. पत्रकार संघाने बॅटींग केली तर जिल्हा परिषद बीड क्रिकेट संघाने क्षेत्र रक्षण केले. जिल्हा परिषद बीड क्रिकेट संघता गणेश सारूक, राजेश आघाव, मोहन परभणे, सतिष वाघमारे, किरण कुमार हिवाळे, शेख आशपाक, विश्वास जावळे, पंकज हिंगे, राजेश मस्के, अविनाश टार्फे, रविंद्र वाव्हळकर, चांगण सुशेन, लक्षण काकडे, गोविंद शिंदे, प्रदिपकुमार राठोड हे होते. या स्पर्धेचे समालोचन नासीर बागवान यांनी केली. आज क्रिकेट, जलतरण, कबड्डी आणि खो-खो स्पर्धा झाल्यात. मंगळवारी सकाळी १०.३० वाजता व्हॉलीबॉल दुपारी २ वाजता थ्रोबॉल स्पर्धा छपत्रती संभाजी महाराज क्रीडा संकुल येथे राहतील. तर बुधवारी रस्सीखेच स्पर्धा सकाळी १०.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथे होईल.

## वाचनालयात शिवजयंती उत्साहात साजरी

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील कै. बाबासाहेब वराट सार्वजनिक वाचनालय बरहाणपुर ता गेवराई येथे छञपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली याकारयकरमात वाचनालय चे अध्यक्ष भागवत वराट यानी छञपती शिवाजी महाराज यांना पुष्प हार घालून आभिवादन केले व शिवाजी महाराज यांच्यावर मार्ग दर्शन पर भाषणं केले महाराज याच्या ३९४व्या जयंती च्या का,रय कर्मास घोडके नितीन जाधव पुंडलिक यादव राजेंद्र वराट विषणुपनत यादव महाराज ओमकार वराट अमित कानडे याच्या सहबहुसखेने वाचक वर्ग उपस्थीत होते आभार प्रदर्शन भागवत वराट यांनी करुन कार्य कर्म सांगता केली.

## डॉ.रमेश साळुंखे साहित्य पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

इंटरनेटच्या माध्यमामुळे सद्या सर्व तरुणाई मोबाईल मध्ये गुंग झाली आहे. मोबाईल, टीव्ही पाहण्याऐवजी युवकांनी चांगले साहित्य वाचून आपली वैचारिक पातळी वाढवावी असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक दगडू दादा लोमटे यांनी केले. छत्रपती संभाजी नगर येथील प्रा. प्रल्हाद लुलेकर प्रतिष्ठान आयोजित निर्मिक सन्मान पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी ते बोलत होते. रविवार दि. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वा. तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कोल्हापूर येथील देवचंद महाविद्यालयात मराठी विषयाचे अध्यापक म्हणून कार्यरत असलेले डॉ. रमेश साळुंखे यांना 'राजकीय नाटक आणि गो. पु. देशपांडे' या ग्रंथाला निर्मिक साहित्य पुरस्कार मिळाला आहे. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील ज्येष्ठ साहित्यिक दगडू दादा लोमटे यांच्या हस्ते डॉ. रमेश साळुंखे यांना निर्मिक सन्मान हा पुरस्कार प्रदान करून त्यांना सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाऊंडेशन बीडचे प्रा. प्रदिप रोडे होते.याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत, लेखक तथा प्रबोधनकार प्रा.प्रल्हाद लुलेकर यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो.डॉ.मनोहर सिरसाट यांनी केले. पुरस्कार समारंभ वितरण कार्यक्रम प्रसंगी प्रास्ताविकात प्रतिष्ठानचे सचिव डॉ.केदार काळवणे यांनी मराठी साहित्यातील समीक्षा, संशोधन आणि वैचारिक लेखनासाठी प्रा. प्रल्हाद लुलेकर प्रतिष्ठान छत्रपती संभाजी नगर यांच्या वतीने निर्मिक साहित्य पुरस्कार सन २०२० पासून सुरू करण्यात आलेला आहे असे सांगितले तसेच प्रतिष्ठानच्या कार्यप्रणाली विषयी त्यांनी माहिती दिली तसेच डॉ. साळुंखे मराठी साहित्य व्यवहारात संशोधक, समीक्षक, अनुवादक आणि नाट्यलेखक म्हणून परिचित आहेत. नाटकातून स्वायत्त राजकीय विचारविश्व मांडणारे, पारंपरिक कलेच्या इतिहासाला छेद देत स्वतःचे वेगळेपण ठसवणारे नाटककार म्हणून गो. पु. देशपांडे यांचे मूल्यमापन पुरस्कारप्राप्त ग्रंथाच्या माध्यमातून साळुंखे यांनी केले आहे. त्यांचा हा ग्रंथ वैचारिक नाटकावर भाष्य करणाऱ्या परंपरेत महत्त्वाचा ठरतो. या पार्श्वभूमीवर या ग्रंथाची पुरस्कारासाठी निवड झाली आहे असे डॉ.केदार काळवणे सांगितले. या पुरस्कार समारंभ प्रसंगी सोलापूर येथील डॉ. दत्ता घोलप यांनी डॉ.सोळुंके यांच्या समीक्षा ग्रंथावर भाष्य केले.

## राज्य शासनाचा स्वराज्य अभियंता इंदुलकर गुणवंत अधिकारी पुरस्काराचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या वतीने देण्यात येणारा स्वराज्य अभियंता हिरोजी इंदुलकर गुणवंत अधिकारी - २०२४ हा पुरस्कार बीड येथील रहिवासी इंजी. कल्याण आत्माराम जाधव ( सहायक संचालक , नगर रचना) यांना यशवंतराव चव्हाण नाटयगृह, मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी शिक्षणमंत्री दीपक केसरकर आणि विभगचे अधिकारी उपस्थित होते. बीड येथील खाडकपुरा भागतील मूळ रहिवासी असलेले कल्याण जाधव यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जिद्द आणि चिकाटीने आपले शिक्षण पूर्ण केले आणि बी.ई. सिव्हील इंजिनियर झाले १९९३ सली त्यांनी नगर रचना विभागात कामास सुरवात केली यात बीड, छ.संभाजी नगर, लातूर, पुणे येथे सहायक नगर रचनाकार, नगर रचनाकार आणि २०२२ साला पासून ते सोलापूर येथे सहायक संचालक , नगर रचना या पदावर कार्यरत आहेत. २०२१ ते २४ या कालावधीत उल्लेखनीय कामकाज करत या कालावधीत एकूण १० विकास योजना शासनास कलम ३० अन्वये सादर केल्या बद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला यात विकास योजना परळी वैजीनाथ, आष्टी, पाटोदा, शिरुर, वडवणी या बीड जिल्हयातील ५ विकास योजना कलम ३० अन्वये शासनास विहीत मुदतीत सादर केल्या. तसेच माजलगाव नगर परिषद मालमत्ता कर आकारणी करुन पुर्ण केली. बार्शी, अक्कलकोट, मंगळवेढा, मोहोळ, माढा या ५ नगर परिषदांच्या विकास योजना, वैराग, नातेपुते, अंगार व्ही.वाय.च्या विद्यमान जमीन वापर नकाशांचे हस्तांतरण, म.न.पा. सोलापूर सह १० नगर परिषदा, व ६ नगर पंचायती असा एकूण १७ गावांचे फ्रिज एरिया नेटवर्क प्लॅन तयार करुन सादर केले. केंद्र शासनाचे राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत वि.यो. अंमलबजावणीसाठी २१ प्रस्ताव मुख्य कार्यालयास सादर केले पंढरपूर विकास प्राधिकरण एस. एम./ ई.पी. नकाशे तयार करुन शासनास सादर केले. अश्या प्रकारच्या अनेक योजना त्यांनी यशस्वी रित्या पार पडल्या बद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

## शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित व्याख्यानाचा लाभ घ्यावा -प्रा.पाटील

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील शिवप्रेमी प्राध्यापक शिक्षक समितीने आगळ्यावेगळ्या पद्धतीने प्रबोधनात्मक शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला आहे. निमित्ताने बीड शहरांमध्ये शिवकालीन शस्त्र प्रदर्शन सोहळा व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे या दोन्ही कार्यक्रमास शिवप्रेमी शिक्षण संस्था संचालक, सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, जिल्हा परिषद तसेच माध्यमिक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, युवक-युवतींसह विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवप्रेमी शिक्षक प्राध्यापक व कर्मचारी आयोजित शिवजन्मोत्सवास समितीचे प्रमुख प्रा. सत्येंद्रजी पाटील सर यांनी केले.

बीड शहरातील शिवप्रेमी शिक्षण संस्था चालक, सर्व प्राचार्य, प्राध्यापक, जिल्हा परिषद तसेच माध्यमिक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या समितीने आगळ्यावेगळ्या पद्धतीने प्रबोधनात्मक शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला आहे. सदरील सोहळा यशस्वी करण्यासाठी बीड शहरातील सर्व शिक्षण संस्थाचालक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मागील पंधरा दिवसापासून अविरत काम करत आहेत. बीड शहरात प्रथमच असा ऐतिहासिक आणि देखणा सोहळा संपन्न होत आहे. महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रातील हा पहिलाच प्रयोग ठरला आहे. या शिव जन्मोत्सवाच्या निमित्ताने उद्या मंगळवार दि. २० फेब्रुवारी रोजी आशीर्वाद मंगल कार्यालयात दुपारी चार वाजता विशेष पोलीस महानिरीक्षक श्री अंकुशरावजी शिंदे साहेब यांचे हस्ते भव्य शस्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. या प्रदर्शनात हजारो शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन पहायला मिळणार आहे. हे प्रदर्शन २० फेब्रुवारी पासून २१ फेब्रुवारी पर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. बुधवार दिनांक २१ फेब्रुवारी सकाळी १० वाजता भव्य रक्तदान शिबिर आणि सायंकाळी ६ वाजता सरखेल कान्होजी राजे अंग्रे यांचे वंशज श्री रघुजीराजे अंग्रे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या सोहळ्याला बीड शहरातील सर्व प्राध्यापक शिक्षक यांच्यासह विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी उपस्थित राहुल ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे असे आवाहन शिवप्रेमी शिक्षक प्राध्यापक व कर्मचारी आयोजित शिवजन्मोत्सवास समितीचे प्रमुख प्रा. सत्येंद्रजी पाटील सर यांनी केले.

## मराठ्यांनो जागे व्हा, राज्य सरकार पाटलांचा जीव घेतयं

**बीड । प्रतिनिधी**






मराठ्यांनो आता शांत बसून चालणार नाही हे सरकार जरांगे पाटलाच्या मरणाची वाट बघत आहे परंतु हे आपण कदापिही होऊन देणार नाहीत या अगोदर आपल्या हलगर्जीमुळे अण्णासाहेब पाटील यांनी स्वतःच्या हाताने गोळी मारून स्वतःचे बलिदान दिलं आणि हे सरकार सुद्धा याच गोष्टीची वाट बघत आहे परंतु लाख मेले तरी चालतील पण लाखाचा पोशिंदा जगला पाहिजे यामुळे आपण सर्वांनी रस्त्यावर उतरून या झोपलेल्या सरकारला जाग करायच आहे हे सरकार झोपले नसून हे झोपेचं सोंग घेत आहे या सरकारने फोडाफोडीचे राजकारण करून महाराष्ट्रातील लोकशाही संपुष्टात आणली आहे खरं म्हणजे यांना विचारणारा कोणी विरोधकच राहिलेला नाही आणि कुणी विरोध केला तर त्याच्यावर खोटे-नाट्य आरोप करून येडीची चौकशी लावून हे आपल्या पक्षांमध्ये सामील करून घेतात आणि परत सर्वसामान्य जनतेमध्ये आमचा पक्ष सर्वात मोठा पक्ष आहे असा आव आणत आहेत परंतु यांना जशास तसे उत्तर देऊन यांची लायकी दाखवायची वेळ आता आलेली आहे आरक्षण तर आज नाही उद्या आपण घेऊच परंतु जरा जरांगे पाटलाच्या जीवाला काय झालं तर ती पोकळी आपण कधीही भरू शकणार नाहीत त्यामुळे प्रत्येक घराघरातून आपण मुलाबाळा सकट रस्त्यावर उतरून या सरकारला धारेवर धरल्याशिवाय स्वस्त बसायचं नाही आणि येणाऱ्या काळामध्ये या सर्व राजकारण्यांना घरी बसवायचं काम आपण करायचं आहे हे सरकार म्हणजे फक्त खोटे आश्वासन बाकी काहीच नाही त्यामुळे आता तरी जागे व्हा कारण या सरकारने एवढा निर्लज पणाचा कळस गाठला आहे की छत्रपती शिवाजी महाराजांच्या खोट्या क्षपता घेऊन महाराष्ट्राची राख रांगोळी केली आहे आणि हिंदुत्वाच्या नावाखाली जाती-जातीमध्ये भांडण लावण्याचे काम हे सरकार करत आहे त्यामुळे सर्व जनतेने त्यांना ओळखून त्यांच्यापासून सावध राहून यांना यांची जागा दाखवून द्यावी असं मत सामाजिक कार्यकर्ता किरण डावकर ऱ्यांनी व्यक्त केल आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com